# कनिष्ठ महाविद्यालय(Junior College)
## कला शाखा (Art Faculty )

**अ) प्रवेशासाठी पात्रता :**

- जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण असतील असे विद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी च्या वर्गात प्रवेश घेण्यास पात्र असतील.
- जे विद्यार्थी इतर राज्यातील माध्यमिक शालांत मंडळाची परीक्षा उत्तीर्ण असतील त्यांनी औरंगाबाद येथील माध्यमिक शिक्षण मंडळाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळविणे आवश्यक आहे. पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) मिळाल्यानंतरच प्रवेशाला अंतिम स्वरुप देण्यात येईल.
- शालांत परीक्षेत दोन विषयांत अनुतीर्ण(नापास) विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वीत प्रवेश मिळेल. परंतु सदरील विद्यार्थ्यांनी ऑक्टोंबर अथवा मार्च २०१८-१९ परीक्षेत शालांत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.अन्यथा सदर विद्यार्थ्यास पुढील वर्षी इयत्ता १२ वीत प्रवेश मिळणार नाही.
- इयत्ता १२ वी (कला)
- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कोणत्याही विभागीय मंडळाशी संलग्न असलेल्या (कनिष्ठ महाविद्यालयातून ११ वी कला परीक्षा उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यास १२ वी कला वर्गात प्रवेश घेता येतो. त्यासाठी ११ वी वर्गात घेतलेले विषय कायम ठेवावे लागतील.

**ब) इ. ११ वी व १२ वी (कलाशाखा) प्रवेश प्रक्रिया**

* इयत्ता १० वी उत्तीर्ण मुळ गुणपत्रक व दोन सत्यप्रती.
* शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी.) व त्याच्या दोन सत्यप्रती
* जातीचा दाखला सत्यप्रत (झेरॉक्स)
* वडीलांचा /पालकांचा उत्पन्नाचा दाखला.
* विद्यार्थ्याचे तीन फोटो
* प्राथमिक /माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यासाठी पी.टी.सी.फॉर्म

**क) इ. १२ वी कला प्रवेश अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावीत.**

- ✻ इयत्ता ११ वी उत्तीर्ण मुळ गुणपत्रक व दोन सत्यप्रती.
- ✻ आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यासाठी ई.बी.सी.फॉर्म.
- ✻ प्राथमिक / माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यासाठी पी.टी.सी.फॉर्म
- ✻ जातीचा दाखला सत्यप्रत (झेरॉक्स)
- ✻ वडीलांचा / पालकाच्या उत्पन्नाचा दाखला
- ✻ विद्यार्थ्याचे तीन फोटो
- ✻ इतर महाविद्यालयातून ११ वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यासाठी ११ वी पास मार्कमेमो, व शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी.)
- ✻ जिल्हाबदल असल्यास शिक्षण अधिकाऱ्यांची परवानगी
- ✻ शिष्यवृत्ती घेतली असल्यास शिष्यवृत्ती मंजुरी क्रमांक

टिप : ज्या विद्यार्थ्याचा शिक्षणामध्ये खंड पडला असेल व पुढील वर्गासाठी त्यास प्रवेश घेणे असल्यास त्या विद्यार्थ्यास मा. तहसिलदार यांच्याकडून प्रतिज्ञापत्र आणावे. प्रतिज्ञापत्र आणणाऱ्या व मूळ शाळा सोडल्याचा दाखला असलेल्या विद्यार्थ्यास भारत सरकार शिष्यवृत्ती मिळेल.ज्या विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्क भरुन प्रवेश घेणे आहे अशा विद्यार्थ्यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

**ग) इ. ११ वी, १२ वी वर्गाच्या परीक्षेसंबंधि (कला)**

- इयत्ता ११ वी व १२ वी कला, वाणिज्य व एम.सी.व्ही.सी.वर्गाची क सत्र परिक्षा, दोन टेस्ट व चार टिटोरियल महाविद्यालयाच्या वतीने घेतले जातात. वार्षिक परीक्षा बोर्डाकडून घेतली जाते.
- बोर्ड परीक्षेचे फॉर्म विद्यार्थ्यांने स्वत: बोर्डाने दिलेल्या वेळेत अचूक भरुन महाविद्यालयात दाखल करावेत.
- फॉर्म उशिरा भरणाऱ्या विद्यार्थ्यांना बोर्ड नियमानुसार विलंब शुल्क भरावे लागेल.
- १२ वी बोर्ड परीक्षा प्रत्येक विषय १०० गुणांचा असून एकूण सहा पेपर ६०० गुणाचे असतील प्रत्येक विषयासाठी वेळ ०३ तास असेल.
- भाषा विषयासाठी २० गुणांची तोंडी परीक्षा असेल, लेखी परीक्षा ८० गुणांची असेल.
- विद्यार्थ्यांची वर्षामध्ये ७५ % उपस्थिती असणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याचा बोर्ड परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.
- बोर्डाकडून वेळोवेळी कळवल्या जाणाऱ्या सूचना विद्यार्थ्यांसाठी सूचना फलकावर लावल्या जातील त्यासाठी विद्यार्थ्यांने सूचनाफलक वाचावा व सुचनांचे पालन करावे.
- महाविद्यालयात येतांना विद्यार्थ्यांनी मोबाईल सोबत आणण्यास सक्त मनाई आहे.

**ड) इ.११ वी/१२ कला (Arts) वर्गासाठी खालीलप्रमाणे विषय शिकविले जातात.**

(एकुण सहा विषय आहेत)

१) आवश्यक/सक्तीचे विषय :-

- ✻ इंग्रजी (English Compualsory)
- ✻ खालील भाषा विषयांपैकी कोणताही एक विषय निवडावा.
- ✻ मराठी(०२)/हिंदी (०४)
- ✻ संगणकशास्त्र (Computer Science)
- ✻ पर्यावरण शास्त्र

२) ऐच्छिक विषय (Optional Subject )

- ✻इतिहास (History) (38)
- ✻राज्यशास्त्र (Political Science)(42)
- ✻समाजशास्त्र (Sociology) (45)
- ✻अर्थशास्त्र (Economics) (49)